मी माझे शपथपत्र नि.यु-२२ वाचले आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यावर माझी सही आहे.

**<u>तक्रारदाराचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्रीमती माळोदे यांचेमार्फत सुरु</u>** -

८. मला यादी नि.४ सोबत दाखल दस्तएवज दाखविण्यात आले. अनुक्रमांक १ हजेरीपत्रकाची छायांकीत प्रत आहे. ते आर्टीकल-ए वर आहे. अनुक्रमांक २ वर रु.७०००-/ ची पावती आहे. त्यास आर्टीकल-बी देण्यात आली. अनुक्रमांक ३ वर चार छायांकीत फोटोच्या चार प्रती आहेत. त्यांना आर्टीकल - सी १ ते चार देण्यात आली.

**<u>तक्रारदाराचा शपथेवर उलटतपास सामनेवाले तर्फे विधीज्ञ श्री पी.पी. शहाणे यांचेमार्फत सुरु</u>**

९. माझे शालेय शिक्षण झालेले नाही. आर्टीकल ए वरिल हजेरीपत्रकात मी सेविका म्हणून काम करीत असल्याचा उल्लेख आहे. हजेरी पत्रकानुसार मी बालक मंदीर व पुर्वप्राथमिक विभागात काम करीत असल्याचा उल्लेख आहे. किलबिल बालकमंदीर नेमके कधीपासून सुरु आहे ते मला सांगता येणार नाही. किलबील बालकमंदीर एन-४ सिडको येथे सुरु आहे. मी नोकरीत लागले त्यावेळी बालकमंदीर भाडयाच्या जागेत सुरु होते. आता स्वत:च्या जागेत सुरु आहे. शाळेत एकुण ३ विभाग आहेत पुर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक. बालकमंदीर हे विनाअनुदानित आहे काय हे मला माहित नाही. परिच्छेद ३ मधील मजकूर बरोबर आहे की उत्तरवादी संस्था मुलांच्या पालकांकडून शुल्क आकारुन संस्था चालवितं.

१०. मी १९९६ पासून उत्तरवादी यांच्य शाळेत नोकरी करीत आहे हे दर्शविण्यासाठी नियुक्ती आदेश किंवा पत्र दाखल केलेले नाही. त्यासंबंधीचे दस्तऐवज आज मी न्यायालयात दाखल करु शकत नाही. मी

..८..

शाळेत नोकरी करीत असल्याबाबत उत्तरवादींनी दिलेले प्रमाणपत्र सुद्धा मी न्यायालयात दाखल केलेले नाही. मी उत्तरवादींकडे कामावर लागण्यासाठी कोणताही अर्ज दिलेला नव्हता. उत्तरवादीने शिपायाची जागा भरण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात दिलेली नव्हती. माझी तोंडी मुलाखत घेण्यात आली होती. श्री. चिंचुरकर अध्यक्ष व श्री कुलकर्णी संचालक यांनी माझी मुलाखत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की मी १९९६ पासून किलबील बालकमंदीरात शिपाई या पदावर कार्यरत आहे हे शपथपत्रात खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी मुलाखत घेण्यात आली हे मी खोटे सांगत आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की मी मुळ तक्रारीत मला उत्तरवादींनी नोकरीत कायम करावे अशी विनंती केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी विनंती परिच्छेदात उत्तरवादींनी मला कामावरुन कमी करण्याची व बदली करण्याची धमकी देवू नये अशा मागण्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी तक्रारीत नमूद केलेल्या मागण्या किंवा दाद प्रस्तुत न्यायालयास देता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की उत्तरवादींच्या बालक मंदीरास उन्हाळी सुटट्या व दिवाळी सुटट्या असतात. मला सुद्धा त्या काळात सुटट्री देण्यात येते. मला प्रत्येक आठवडयात रविवारी सुटट्री असते. हे म्हणणे खरे नाही की उत्तरवादी चालवित असलेल्या बालकमंदीरास शासनाचे कोणतेही नियम लागू नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी २००१ पासून बालकमंदीरात काम करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी सेविका म्हणून काम करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी अर्धवेळ सेविका म्हणून काम करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी १९९६ पासून उत्तरवादीकडे काम करीत आहे कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाही.

..९..

१२. साक्षीदारास नि.सि-१६ वरील अनुक्रमांक १ चे दस्तऐवज दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. अनुक्रमांक २ वरील दस्तऐवज दाखविण्यात आले. त्यावर देखिल माझी सही आहे. अनुक्रमांक १९ वरील दस्तऐवज दाखविण्यात आले. ते दि.०४.०४.२०२० चे पत्र आहे. त्यावर देखिल माझी सही आहे. यादी नि. सि-९ पृष्ठ क्र.६ व ७, अनुक्रमांक ३, ५, वरील दस्तऐवज दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की मी एकदा भारतीय दलित पॅंथर युनियन मार्फत उत्तरवादीस मी एक अर्ज दिला होता. आता मला यादी सि-१६ वरील दस्तएवज अनुक्रमांक ८ व १० दाखविण्यात आला. त्यावरील सहया भगवान खोतकर यांच्या आहेत. त्या मी ओळखते. सदर पत्रांना उत्तरवादींमार्फत उत्तर देण्यात आले होते काय ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सदर भारतीय दलीत पॅंथर मार्फत वेळोवेळी अर्ज करुन उत्तरवादींनी मला कामावरुन कमी करु नये यासाठी दबाव आणीत आहे. हे म्हणणे खरे नाही की संस्थेने मला जाती भावनेने वागवलेले नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की उत्तरवादीकडे सेवकाचे कोणतेही पद उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी करीत असलेले काम कायमस्वरुपाचे नाही किंवा कायमपदाचे नाही. हे म्हणणे खरे नाही की किलबील बालकमंदीरात माझे काम समाधानकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की मी वरिष्ठांशी उद्धटपणे वागत असते. हे म्हणणे खरे नाही की मी जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिका-यांकडे उत्तरवादींविरुद्ध खोटया तक्रारी करीत असते. मी उत्तरवादींकडे कधीही पहारेकरी म्हणून काम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की उत्तरवादींच्या सचीव व अध्यक्ष यांनी मला कामावरुन काढून टाकण्याची धमकी दिली हे मी खोटे नमूद केले आहे.

हे म्हणणे खरे नाही की उत्तरवादींनी प्रकाश जोशी यांना शिपाई यांना कामावर घेतले व कायम केले हे केवळ ते संस्थाचालकांच्या मर्जितील व नात्यातील होते म्हणून केले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रकाश जोशी हे माध्यमिक शाळेत कायमस्वरुपी शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांची नियुक्ती योग्यप्रकारे केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की परिच्छेद ७ मध्ये मी नमूद केल्याप्रमाणे मला आत्महत्या करावीशी वाटते तक्रारीत नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी कधीही उत्तरवादीकडे प्रत्येक वर्षी २४० दिवस सेवा पुर्ण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी काम करीत असलेल्या सेविका या पदास शासनाची मान्यता नाही. हे म्हणणे खरे नाही की मला कोणत्याही प्रकारे निवडप्रक्रीया न अवलंबिता तात्पुरत्या पदासाठी अर्धवेळ काम देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की माझी नियुक्ती अर्धवेळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे मी तक्रारीत केलेली कोणतेही मागणी मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

सही/—

**(श्री. श्री. मौदेकर)**
**सदस्य,**
**औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद**

**दिनांक : ०६.०७.२०२४**